आकाशवाणी मुंबई

प्रादेशिक बातमीपत्र - दुपारी ३.०० वाजता

११ नोव्हेंबर २०२४ - सोमवार

**ठळक बातम्या**

- भारत आणि रशियानं व्यापारी संबंध आणखी दृढ करण्याची गरज असल्याचं परराष्ट्र मंत्री एस. जयशंकर यांचं प्रतिपादन

- विधानसभा निवडणुकीत पक्षविरोधी कारवाई केल्याबद्दल काँग्रेसच्या अठ्ठावीस पदाधिकाऱ्यांचं सहा वर्षांसाठी पक्षातून निलंबन

- देशाचे ५१ वे सरन्यायाधीश म्हणून न्यायमूर्ती संजीव खन्ना यांनी घेतली शपथ

**आणि**

- भारतीय आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सवात यंदाचा 'सत्यजित रे जीवनगौरव पुरस्कार' ऑस्ट्रेलियन चित्रपट निर्माते फिलिप नोईस यांना दिला जाणार

**<><><><><>**

भारत आणि रशियानं व्यापारी संबंध आणखी दृढ करण्याची गरज परराष्ट्र मंत्री एस. जयशंकर यांनी आज व्यक्त केली. मुंबईत भारत - रशिया व्यावसायिक परिषदेला ते संबोधित करत होते. रशियाचे प्रथम उप प्रधानमंत्री डेनिस मान्टुरोव्ह यांच्यासह विविध मान्यवर यावेळी उपस्थित होते. दोन्ही देशांमधला व्यापार सध्या ६६ अब्ज अमेरिकन डॉलर आहे. २०३० पर्यंत हा व्यापार १०० अब्ज डॉलरच्या पलीकडे जाईल, असा विश्वास त्यांनी यावेळी व्यक्त केला. दळणवळण, बँकिंग आणि आर्थिक देवाण-घेवाणीच्या संदर्भातले अडथळे दूर करण्यासाठी दोन्ही देशांकडून प्रयत्न सुरू आहेत. लवकरच दोन्ही बाजूंना मान्य असलेला तोडगा निघेल, अशी आशा त्यांनी व्यक्त केली.

**<><><><><>**

विधानसभा निवडणुकीत पक्षाच्या अधिकृत उमेदवाराविरुद्ध बंडखोरी करत उमेदवारी दाखल केल्याबद्दल तसंच पक्षविरोधी कारवाई केल्याबद्दल काँग्रेसने विविध मतदारसंघातल्या २८ पदाधिकाऱ्यांना सहा वर्षांसाठी पक्षातून निलंबित केलं आहे. ही कारवाई प्रदेश प्रभारी रमेश चेन्निथला यांच्या आदेशावरून तसंच प्रदेशाध्यक्ष नाना पटोले यांच्या निर्देशावरून केल्याची माहिती काँग्रेसचे प्रशासन आणि संघटन उपाध्यक्ष नाना गावंडे यांनी दिली. कारवाई केलेल्या पदाधिकाऱ्यात आनंदराव गेडाम, शिलु चिमुरकर, सोनल को◌ेवे, भरत येरमे, अभिलाषा गावतुरे, राजु झोडे, प्रेमसागर गणवीर, विलास पाटील, अजय लांजेवार, आसमा चिखलेकर, याज्ञवल्क्य जिचकार, शामकांत सनेर, राजेंद्र ठाकुर, आबा बागुल आदींचा समावेश आहे.

<><><><><>

केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांनी आज नागपूरात कटोल इथं महायुतीचे उमेदवार चरणसिंग ठाकूर यांच्या प्रचारार्थ सभा घेतली. मेटमांजरा आणि भागातलं ८ किलोमीटरचं वनविभागानं अडवून ठेवलेल कामासाठी १५० कोटी रूपये वाढवून काटोल ते नागपूर रस्त्याचं कामाला मंजूरी दिली असल्याचं त्यांनी म्हटलं. यामुळे नागपूरवरून अमरावतीला जाण्यासाठी पर्यायी मार्ग सुरु झाल्याचं त्यांनी सांगितलं. काटोल, नारखेड, वरुड, मोरशी या भागात कमी होत असलेल्या पाण्याच्या पातळीसाठी जलसंवर्धनाचा उपक्रम राबवून, प्रत्येक विहरीवर सोलर पंप लावण्याची योजना सरकारनं आणली असल्याचं त्यांनी सांगितलं.

<><><><><>

राज्यातल्या शेतकऱ्यांच्या शेतमालाला हमीभाव मिळत नाही, मात्र भाजपाचे नेते ३७० कलमसारखे मुद्दे मांडून लोकांची दिशाभूल करत आहेत, अशी टीका

माजी मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांनी केली. ते आज वणी मतदारसंघात आयोजित प्रचारसभेत बोलत होते. मुंबईसह राज्यभरातले विविध प्रकल्प विशिष्ट उद्योगसमूहाला आंदण दिले जात असून भाजपा हिंदू-मुस्लिम भांडण लावत असल्याचा आरोप ठाकरे यांनी केला.

<><><><><>

अकोला जिल्ह्यात आजपासून गृहमतदानाला सुरुवात झाली आहे. ९८ वर्षांचे निवृत्त सरकारी कर्मचारी श्रीवल्लभ देशपांडे यांनी त्यांच्या निवासस्थानी मतदानाचा हक्क बजावला. ज्येष्ठ आणि दिव्यांग नागरिकांना मतदानापासून वंचित राहावं लागू नये यासाठी गृहमतदानाची सोय उपलब्ध करून देण्यात आली आहे.

<><><><><>

निवडणूक आयोगाच्या निगराणी पथकाने दहिसर पश्चिम इथं जवळपास दीड किलोपेक्षा जास्त वजनाचं सोनं जप्त केलं आहे. याची किंमत एक कोटी ४३ लाख इतकी आहे. विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर बेहिशेबी पैसे आणि संपत्तीची देवाणघेवाण रोखण्याच्या उद्देशाने ही कारवाई केली जात आहे.

<><><><><>

धुळे जिल्ह्यातल्या शिरपूर तालुक्यात भोईटी इथं अंमली पदार्थ विरोधी विभागाच्या पथकानं २ हजार ८१६ किलो वजनाचा आणि ५ कोटी ६३ लाख रुपये किमंतीचा गांजा जप्त केला आहे. या कारवाई वेळी आरोपी घटनास्थळावरून पसार झाले असून पुढील तपास सुरु आहे.

<><><><><>

स्वीप या मतदार जनजागृती कार्यक्रमांतर्गत केंद्रीय संचार ब्युरोच्या चित्ररथाला आज छत्रपती संभाजीनगर जिल्ह्याचे जिल्हाधिकारी दिलीप स्वामी यांच्या हस्ते

हिरवा झेंडा दाखवण्यात आला. मतदानाची टक्केवारी ७५ ते ८० टक्क्यापर्यंत वाढवण्यासाठी या चित्ररथाचा उपयोग होईल, असं जिल्हाधिकारी म्हणाले. नंदुरबारमध्येही केंद्रीय संचार ब्युरो आणि निवडणूक आयोगामार्फत पाठवण्यात आलेल्या मतदान प्रचार रथाचा शुभारंभ जिल्हाधिकारी मिताली सेठी यांच्या हस्ते झाला. धाराशिव इथं देखील अखिल भारतीय विद्यार्थी परिषदेच्या वतीनं मतदार जनजागृती यात्रेचा आरंभ आज झाला.

दरम्यान, मराठी अभिनेत्री धनश्री काडगावकर हिने मतदारांना मतदान करण्याचं आवाहन केलं.

**होल्ड बाईट - धनश्री काडगावकर (७ सेकंद)**

**<><><><><>**

श्रोते हो, विधानसभा निवडणुकीच्या निमित्तानं ‘आढावा विधानसभा मतदारसंघांचा’ हा कार्यक्रम दररोज संध्याकाळी ७ वाजून १० मिनिटांनी अस्मिता वाहिनीसह प्रादेशिक वृत्त विभागाच्या Youtube वरुन प्रसारित केला जात आहे. या कार्यक्रमात आज **पुणे** जिल्ह्यातल्या मतदारसंघांचा आढावा आपल्याला ऐकता येईल.

**<><><><><>**

झारखंड विधानसभेच्या पहिल्या टप्प्यात १३ नोव्हेंबर रोजी ४३ जागांसाठी मतदान होणार आहे. त्यासाठी आज संध्याकाळी प्रचार थांबणार आहे. भाजपाचे ज्येष्ठ नेते प्रधानमंत्री नरेंद्र मोदी दुपारी १२ वाजता पक्ष कार्यकर्त्यांशी दूरदृश्य प्रणालीच्या माध्यमातून संवाद साधणार आहे. राष्ट्रीय लोकशाही आघाडी आणि इंडिया आघाडी यांनी जोरदार प्रचार केल्याचं आमच्या वार्ताहरानं कळवलं आहे.

वायनाड लोकसभा पोटनिवडणुकीसाठीही आज प्रचार थांबणार आहे. युनायटेड डेमोक्रेटिक फ्रंटकडून काँग्रेस उमेदवार प्रियांका गांधी निवडणूक लढवत आहेत, तर भाजपकडून नव्या हरिदास आणि लेफ्ट डेमोक्रेटीक फ्रंटचे उमेदवार सत्यन मोकेरी यांच्यात तिरंगी लढत आहे.

आसाममध्येही विधानसभेच्या ५ जागांसाठीच्या पोटनिवडणुकीचा प्रचार आज संध्याकाळी संपणार आहे. एकूण ३४ उमेदवार रिंगणात आहेत. भाजपनं विधानसभेच्या ३ जागांवर तर आसाम गण परिषद आणि यूपीपीएलनं प्रत्येकी एका जागेवर उमेदवार उभे केले आहेत. काँग्रेस पाचही जागा लढवत आहे.

**<><><><><>**

देशाचे ५१ वे सरन्यायाधीश म्हणून न्यायमूर्ती संजीव खन्ना यांनी आज पदभार स्वीकारला. राष्ट्रपती भवनात झालेल्या समारंभात राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी खन्ना यांना पद आणि गोपनियतेची शपथ दिली. या सोहळ्याला उपराष्ट्रपती जगदीप धनखड, प्रधानमंत्री नरेंद्र मोदी, अनेक केंद्रीय मंत्री आणि सर्वोच्च न्यायालयाचे न्यायाधीश उपस्थित होते.

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी न्यायमूर्ती संजीव खन्ना यांना सर्वोच्च न्यायालयाचे सरन्यायाधीश म्हणून शपथ घेतल्याबद्दल आणि त्यांच्या कार्यकाळासाठी शुभेच्छा दिल्या आहेत.

न्यायमूर्ती संजीव खन्ना यांनी १९८३ मध्ये वकिलीची सुरुवात केली. त्यांनी जानेवारी २०१९ पासून सर्वोच्च न्यायालयाचे न्यायाधीश म्हणून काम केलं आहे. २००५ मध्ये दिल्ली उच्च न्यायालयाचे अतिरिक्त न्यायाधीश म्हणून त्यांची नियुक्ती करण्यात आली. निवडणूक बॉँड योजना रद्द करणे, कलम ३७० रद्द करणे यांसारखे अनेक ऐतिहासिक निर्णय घेण्यात त्यांचा सहभाग होता.

**<><><><><>**

इफ्फी अर्थात भारतीय आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सवात यंदाचा सत्यजित रे जीवनगौरव पुरस्कार ऑस्ट्रेलियन चित्रपट निर्माते फिलिप नोईस यांना दिला जाणार आहे. माहिती आणि प्रसारण सचिव संजय जाजू यांनी नवी दिल्लीत वार्ताहर परिषदेत ही माहिती दिली. गोव्यात २० नोव्हेंबरपासून हा महोत्सव सुरू होणार असून २८ नोव्हेंबरपर्यंत सुरू असेल. ऑस्ट्रेलिया या वेळेचा ‘फोकस कंट्री ऑफ द इयर’ आहे. या महोत्सवासाठी १०१ देशांतून १ हजार ६७६ प्रवेशिका आल्या होत्या. त्यापैकी ८१ देशातले १८० चित्रपट महोत्सवात दाखवले जाणार असल्याची माहिती त्यांनी दिली. भारतीय सिनेमा देशाच्या अर्थव्यवस्थेत महत्त्वाचं योगदान देत असल्याची माहिती प्रसारण राज्यमंत्री एल. मुरुगन यांनी दिली. नव्या चित्रपट निर्मात्यांना प्रोत्साहन देण्यासाठी उत्कृष्ट नवोदित भारतीय दिग्दर्शक पुरस्कार यंदापासून सुरू होणार आहे.

**<><><><><>**

माजी मंत्री बाबा सिद्दीकी यांच्या हत्येप्रकरणी मुख्य आरोपी शिवकुमार याला उत्तर प्रदेशातल्या बहराईच इथून अटक करण्यात आली आहे. लॉरेन्स बिष्णोई टोळीशी संबंध असल्याचं शिवकुमारनं पोलिसांनी केलेल्या चौकशीत कबूल केलं आहे. शिवकुमारला मदत करणारे अनुराग कश्यप, ज्ञानप्रकाश त्रिपाठी, आकाश श्रीवास्तव आणि अखिलेशेंद्र प्रताप सिंह यांनाही अटक करण्यात आली आहे.

**//<><><><><>//**